| MHPU240007302013 | **रे.मु.नं. १४८/२०१३**<br>**पांडुरंग भोर**<br>विरुद्ध<br>**वामन भोर व इतर** |
|---|---|

## निशाणी क्र.४३ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीच्या अर्जातील कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी सदरामध्ये प्रतिवादी क्र.१४(क) सौ. सुषमा माणिक होरे यांचे नाव अनावधाने व नजरचुकीने सौ. जयश्री माणिक होरे असे टाईप झालेले आहे. त्यामुळे, दाव्याचे सरनाम्यात त्यांच्या नावाबाबत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी यांचे म्हणणे मागविले असता प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

**०४.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दावा हा दावा ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. परंतु, दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.१४(क) सौ. सुषमा माणिक होरे यांचे नाव नजरचुकीने सौ. जयश्री माणिक होरे असे टाईप झाल्याचे दिसुन येते. सदर अर्जातील सत्यतेकरीता वादी यांनी नि.क्र.४४ अन्वये त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता वादीने मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे, सदरच्या दुरुस्तीचे स्वरुप पाहता, वादीच्या दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा सदर दुरुस्तीमुळे दाव्यातील प्रतिवादींच्या न्यायहक्कांवर कोणत्याही प्रकारे गदा येणार

नाही. उलटपक्षी, सदर अर्ज मंजुर केल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: गुणवत्तेवर न्यायनिर्णित करणे सोयीचे होईल. सदरचा दावा सन २०१३ मध्ये दाखल केलेला असुन वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.१९/०८/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. सदर उशीराबाबत वादीस दंड आकारुन अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.४३ हा रक्कम रु.२००/— (रुपये दोनशे मात्र) इतका दंड शासनास जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी प्रस्तुत अर्जाप्रमाणे दाव्याचे सरनाम्यात १४ दिवसाचे आत अथवा पुढील तारखेपर्यत दुरुस्ती करावी.

३. सदर आदेश खुल्या न्यायालयात पारीत करण्यात आला.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.09.25 14:00:00 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

दि.२३/०९/२०२४
स्थळ : घोडेगांव